# महाराष्ट्र शासन

**क्रमांक :** शावाख १०२३/प्र.क्र ५४/प्रशा-५
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३०

वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक-: १७/०३/२०२५

प्रति,

संचालक (माहिती तंत्रज्ञान)
सामान्य प्रशासन विभाग,
७ वा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**विषय -: वित्त विभागासाठी लागणाऱ्या कार व जीप खरेदीची निवीदा शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, विभागाच्या मा.उपमुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री यांच्याकरिता दोन नवीन कार, तसेच कार्यालयीन कामकाजासाठी एक कार व एक जीप खरेदी करणे प्रस्तावित आहे. वाहनाची खरेदीची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची असून सदर निविदा जाहिरात दिनांक १७ मार्च,२०२५ रोजी प्रकाशित करावी, ही विनंती. सोबत निविदा सूचना व निविदा संदर्भात नियम व अटींचा मजकूर जोडला आहे.

(शुभांगी शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**सोबत:** सहपत्र

प्रत:-प्रशासन-५ कार्यासन संग्रहार्थ.

Scanned with OKEN Scanner

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
प्रशासन-५,रुम नं ३५७,३ रा मजला,विस्तार इमारत
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३ ई मेल - adm५.fd@maharashtra.gov.in

---

क्र.शावाख १०२३/प्र.क्र५४/प्रशा-५ दिनांक- १७/०३/२०२५

(Tender Notice)

**दरपत्रकाबाबच्या सुचना**

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई या विभागाच्या मा.उपमुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री यांच्याकरिता दोन नवीन कार, तसेच कार्यालयीन कामकाजासाठी एक कार व एक जीप खरेदी करणे आवश्यक आहे. तद्नुषांगाने मोहोरबंद दरपत्रकाच्या निवीदा मागविण्यात येत आहेत. पुढे उध्दत करण्यात आलेल्या अटी व शर्ती विचारात घेऊन कार खरेदीबाबतची दरपत्रके **दि.२०/०३/२०२५ रोजी दु.०३.३० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात, कक्ष अधिकारी (प्रशा-५), दालन क्र.३५७,तिसरा मजला,वित्त विभाग,मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२** यांचे नावे पाठविण्यात यावीत.

२. याबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) सदर कार (Innova-crysta) व **जीप** (Mahindra Bolero) (वाहनाची किंमत+वस्तु व सेवा कर+टेंम्परररी रजिस्ट्रेशन चार्जेस+सहाय्यभुत साहित्य) इ.सह असावी.

२) एका विक्रेत्यास एकच निविदा सादर करता येईल. विक्रेत्याने उपरोक्त वाहनाच्या उपलब्ध सर्व मॉडलचे दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.

३) निविदाकारांकडून त्यांची दरपत्रके दि. **दि.२०/०३/२०२५ रोजी दु. ०३.३० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात, कक्ष अधिकारी (प्रशा-५), दालन क्र.३५७,तिसरामजला,वित्त विभाग,मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२** यांचे नावे पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

४) मोहदबंद लिफाफ्यावर वाहन खरेदी साठी दरपत्रक असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये तांत्रिक निविदा मोहोरबंद करुन दरपत्रक सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही.

५) प्राप्त दरपत्रक दि. २०/०३/२०२५ रोजी अवर सचिव (प्रशा-५), तिसरा मजला,वित्त विभाग,मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे दु.५,०० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी दरपत्रक धारक स्वत किंवा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

Scanned with OKEN Scanner

६) दरपत्रकासोबतच्या विहित फॉर्म्सह, दरपत्रकाचे रु.५०००/- बयाणा रक्कमेचा (EMD) अवर सचिव,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई यांच्या नावे काढलेला धनाकर्ष/धनादेश तांत्रिक लिफाफ्यासोबत दर्शविलेल्या पत्यावर जमा करण्यात यावा.

७) निविदा स्वीकृत होऊन पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी करण्यात आलेल्या वाहनाचा वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई येथे तात्काळ व स्वीकृत दरपत्रकानुसार पुरवठा करणे विक्रेत्यावर बंधनकारक राहील.

८)वाहन पुरवठा केल्यानंतर मुद्रांक पावतीसह देयक सादर करावे. देयकाची रक्कम ECS द्वार जमा करण्यासाठी बॅक खात्याचा सविस्तर तपशिल सादर करणे आवश्यक राहिल. परिपुर्ण देयक सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी विक्रेत्याची राहील. तसेच प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

९) कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा,निविदा प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

१०) विक्रेता संस्थेचा स्वत चा वस्तु व सेवा कर नोंदणी (GST) क्रमांक आवश्यक राहील.

११) निविदेची निवड करताना,मागणी केलेल्या वाहनाचे,न्यूनतम दर,तसेच वाहनासोबत दिल्या जाणा-या मोफत अक्सेसरीचा प्रामुख्याने विचार केला जाईल.

१२) वाहनाचा पुरवठा करताना पुढील बाबींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

अ) वाहनांचे दर चालू बाजारापेक्ष कमी किमतीचे असणे बंधनकारक राहील.

ब) पुरवठादाराकडून पुरविण्यात येणाऱ्या वाहनाच्या व इतर सलग्न वस्तुच्या दर्जात अथवा किंमतीत पुरवठदाराने कोणताही बदल केल्यास सदर वस्तू नाकारणे तसेच दरपत्रकाचे पालन समाधानकारक न झाल्यास दरपत्रक संपुष्टात आणणे,याबाबत शासनाचा निर्णय अंतिम राहील.

३. वरील अ व ब बाबींची पूर्तता न झाल्यास विक्रता योग्य त्या कार्यवाहीस पात्र असेल व त्यास काळया यादीत (Black list) टाकले जाईल.

४. उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे तांत्रिक निविदा दरपत्रकामध्ये नमूद असले,तरच निविदाकाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

(शुभांगी शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

Scanned with OKEN Scanner

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग

प्रशासन-५३५७ रुम नं,,विस्तार इमारत,रा मजला ३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३ ई मेल - adm५.fd@maharashtra.go

---

क्र.शावाख १०२३/प्र.क्र ५४/प्रशा-५ दिनांक- १७/०३/२०२५

**वित्त विभागास कारचा पुरवठा करण्याबाबत निविदा**

**<u>तांत्रिक दरपत्रक</u>**

१. पुरवठादाराचे/संस्थेचे नाव -

२. संपुर्ण पत्ता/कार्यालय -

३. दूरध्वनी क्रमांक कार्यालय व मोबाईल क्रं -

ई-मेल -

४. निविदा प्रपत्र भरुन देण्याचा अंतिम दिनांक - दि.२० मार्च,२०२५ दु.०३.३०वाजेपर्यत

५. आयकर नोंदणी क्रमांक पॅन -

६. वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक -

i) प्रमाणपत्र देणारे कार्यालय -

ii) प्रमाणपत्राची नोंदणी -

iii) वैधतेची मुदत -

७. व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या -

विविध नोंदण्या दुकाने व संस्था अधिनियम १९४८ -

प्रमाणपत्र देणारे कार्यालय........ -

प्रमाणपत्राचा नोंदणी ....... -

वैधतेची मुदत....... -

८. अधिकृत पुरवठादार असल्याचे प्रमाणपत्र (Dealership Certificate) असणे बंधनकारक आहे.

९. प्रत जोडावी पुरवठदाराने इतर शासकीय कार्यालयांना वाहन पुरवठा करण्याचा अनुभव असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

१०. दरपत्रंकाच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**दिनांक -**

**स्थळ -** **निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

**(सूचना - दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड,गिरवणे,ओव्हररायटिंग,पांढरी शाई लावणे,चूकून तसे करणे आवश्यक असल्यास त्या ठिकाणी पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)**

Scanned with OKEN Scanner